RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

## UGC-CARE LISTED



***RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT***

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal
UGC CARE LISTED JOURNAL

February – 2020

## Rethinking Mahatma Gandhi in Present Context

**Executive Editor**
Dr. Kiran Save
Principal

Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar Dist. Palghar [M.S.] India

**Co-Editors**
Dr. Tanaji Pol
Asst. Prof. Anagha Padhye Deshmukh

**Chief Editor**
Dr. Nanasaheb Suryawanshi
Pratik Prakashan, Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur
Dist. Latur- 433515, Maharashtra

Published by – Dr. Kiran Save, Principal,Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.

© all rights reserved with the Editors

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनेजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये–देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले – पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य–साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोधले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गाँधी – एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभावः लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो

डॉ. तानाजी पोळ
सहयोगी प्राध्यापक,
सोनोपंत दांडेकर कॉलेज, पालघर.
अभ्यागत प्राध्यापक
मध्ययुरेशिया अभ्यास केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.
tanajijpol@gmail-com

A man is but a product of his thoughts. What he thinks he becomes-ß
& Mahatma Gandhi

## महात्मा गांधीः एक असामान्य व्यक्तिमत्व :

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील राष्ट्रपिता म्हणून नावाजलेले मोहनदास करमचंदगांधी हे केवळ भारतीयांनाच नव्हेतर संपूर्ण जगास ज्ञात आहेत. गुजरातमधील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी जन्मलेले बापू हे बनिया कुटुंबात वाढले. वडील करमचंद गांधी हे तत्कालीन पोरबंदर येथील काठेवाड प्रांतातील दिवाण म्हणून कार्यरत होते तर आई पुतळीबाई याधार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. वयाच्या घर्व्यावर्षी गांधींचा विवाह कस्तुरबा माखनजी सोबत झाला. भारतात आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते वयाच्या घश्व्यावर्षी इंग्लंडला वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी रवानाझाले. तेथे कायद्याचे शिक्षण पूर्णकरून बॅरिस्टर होऊन ते भारतात वकिलीकरू लागले. गांधींनी उभारलेल्या अनेक सत्याग्रहात त्यांच्या वैयक्तिक जडणघडणीचा भाग महत्वाचा आहे. अहिंसेला सत्याचे साधनमानून त्यांनी अनेक सत्याग्रह यशस्वी रित्या पारपडले.

दक्षिण आफ्रिकेत वर्ण भेदाविरुद्ध उभारलेला लढाही त्यांच्या सत्याग्रहाची प्रथम सुरुवात असे म्हणता येईल. ''दक्षिणआफ्रिकेत भारतीयांवर होणारा अन्याय लक्षात घेता त्यांच्या मनात भारतीयांचा सन्मान आणि ब्रिटीश साम्राज्या अंतर्गत त्यांची स्वतःची ओळख याविषयी प्रश्ननिर्माण होऊ लागले. दक्षिण आफ्रिकेत, गांधीजींनी भारतीयांना त्यांच्या राजकीय आणि सामाजिक हक्कांसाठी संघर्ष करण्याची

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

प्रेरणा दिली." दक्षिण आफ्रिकेतील मिळालेली असमानतेची वागणूक गांधींच्या जीवनाला एक नवी कलाटणी देऊन गेली. भारतात आल्या नंतरही त्यांनी अनेक प्रश्न जसे कि , बिहारमधील चंपारण सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, बार्डोली सत्याग्रह यांसारखे अनेक सत्याग्रहांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची मुहूर्त मेढरोवली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर काँग्रेसचे नेतृत्व हाताळत त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला एक वेगळे स्वरूप दिले. अनेक प्रयत्नांनी गांधी तळागाळातील लोकांपर्यंत पोचले. "गांधीजींनी सत्याग्रहाचा केवळ सिद्धांत मांडला नाही तर स्वत: त्याचे आचरण केले व कार्यकर्त्यांनाही त्याचे धडे दिले. शेकडो लोक हिंसेचा अवलंब न करता ब्रिटिशांचा अत्याचार सोसत आहेत, हे जगाने पहिले व या तत्वाचा खूप मोठा आदर जगभर झाला, त्याच काळात जगभर हिंसक क्रांत्या होत होत्या, परंतु कालांतराने जगाने वाखाणणी केवळ गांधी तत्वांचीच केलेली आपण पाहिली." त्यानंतर पुढील भारतीय स्वातंत्र्य लढा हा एक इतिहास बनला ज्यामध्ये गांधींची उल्लेखनीय कामगिरी ही अतिशय महत्वाची ठरते.

या सर्व गोष्टींमध्ये गांधीं वर पडलेल्या अनेक धर्मांचा, आणि व्यक्तींचा प्रभाव हा विशेष महत्वाचा ठरतो. ज्या व्यक्तींनी गांधींना घडवले त्या गांधींनी जगाला मोठी देणगी दिली. उभ्या आयुष्यात अनेक गोष्टींचे संबंध आल्याने गांधींचे व्यक्तिमत्व हे अधिक परिणामकारक बनले. त्यात विशेषत: बालपणापासूनच धर्माच्या शिकवणीचे धडे गिरवले गेले. गांधींवर हिंदू धर्माचा सखोल परिणाम झाला होता. हे स्वत:ला सनातनी हिंदू म्हणून समजत असत. त्या खेरीज जैन धर्म, ख्रिश्चन धर्म आणि बौद्ध धर्माच्या ही शिकवणीचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. ''गांधीवाद हा धार्मिक मानवतावाद आहे. नीतिशास्त्र, समाजरचना व राजनीती यांस आधारभूत अशी नैतिक दृष्टी या मानवतावादा मध्ये स्वीकारलेली दिसते. ईश्वर निष्ठा ही मूलभूत आहे. ईश्वर म्हणजेच सत्य व सत्य म्हणजेच ईश्वर, असे गूढवादी समीकरण गांधींनी मांडले आहे.'' एवढेच नव्हे तर गांधींच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण ही इतर अनेक विचारवंतांपासून वेगळी ठरण्याचा आणखी एक विशेष कारण म्हणजे त्यांच्यावर पडलेला पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव. केवळ धर्मच नव्हे तर जगातील मोठे विचारवंत, व तत्वज्ञानी लोकांचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. त्यात प्रामुख्याने लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन व डेविड थोरो यांचा समावेश होतो. प्रस्तुत शोधनिबंधांत याला अनुसरूनच महात्मा गांधीवर व त्यांच्या विचारांवर लिओ टॉलस्टोय, जॉनरस्किन आणि हेनरी डेविड थोरो यांच्या प्रभावाची मीमांसा केलेली आहे.

## महात्मा गांधी आणि टॉलस्टोय :

लिओ टॉलस्टॉय हा प्रख्यात रशियन लेखक, थोर साहित्यिक, व अराजकवादी तत्वज्ञ म्हणून संपूर्ण जगास ज्ञात आहे. लिओ टॉलस्टॉय यांच्या 'The kingdom of God is Within You' या ग्रंथाने

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधींना टॉलस्टॉयकडे आकर्षित केले. टॉलस्टोय यांचा साधेपणा गांधींना भावून गेला. तसेच टॉलस्टॉय यांनी त्यांच्या पुढील आयुष्यात जी शिकवण लोकांना दिली त्या शिकवणीचे स्वत: आचरण केले. टॉलस्टॉय यांच्या साहित्याचा व विचारांचा प्रभाव म्हणून महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग या ठिकाणी जागा घेऊन तेथे टॉलस्टॉय फार्मची निर्मिती केली. ''वर्णद्वेष विरोधी लढ्यामध्ये सहभागी होणाऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी तसेच स्वयंपूर्ण आयुष्य जगण्या करिता टॉलस्टॉय फार्म मध्ये महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली काही कार्यक्रम राबवण्यात येत असत. या वास्तूत गुजराती, तामिळी, हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, पारशी असे विविध भाषा–धर्मांचे लोक एकत्र राहत असत.'' आफ्रिकेतील जी अनेक कुटुंब वर्णभेदाचे बळी ठरले त्यांना आश्रय देण्याचे कार्य टॉलस्टॉय फार्मने केले. मुळातच गांधींवर टॉलस्टॉयच्या अहिंसक विचारांचा प्रभाव असल्याने या जागेला गांधींनी 'टॉलस्टोयफार्म' असे नाव दिले, व तत्कालीन परिस्थितीत या संस्थेद्वारे गांधींनी आफ्रिकेत मोलाची भूमिका बजावली.गांधी हे टॉलस्टॉय यांच्या अराजकवादाच्या संकल्पनेने प्रभावित झाले होते. टॉलस्टॉय आणि गांधी यातील साधर्म्य लक्षात घेता दोहोंमधील विचारांची समानता ही राज्याच्या अस्तित्वाला होणाऱ्या विरोधातून दिसून येते. राज्याच्या अस्तित्वामुळे व्यक्तिविकासाला अनेक मर्यादा निर्माण होतात. अहिंसक मार्गाचे समर्थन करून दोन्ही विचारवंतांनी जनतेसाठी राज्याची भूमिका विशद केली.

महान विचारवंत आणि श्रेष्ठ रशियन कादंबरीकार लिओ टॉलस्टॉय यांच्या अहिंसात्मक विचारांनी गांधींवर मनावर छाप सोडली होती. गुरुशिष्याचे नाते दोघांमधील इतके घनिष्ट झाले होते ते त्यांनी तत्कालीन केलेल्या पत्रव्यवहारातून दिसून येते. गांधीजी टॉलस्टॉय यांना गुरु समान मानत असत. ''अहिंसेचे तत्त्वज्ञान हा या दोघांना जोडणारा समान दुवा. अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार जागतिक स्तरावर होण्याची निकड गांधीजींना वाटत होती. त्या संबंधी त्यांनी टॉलस्टॉय यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारातून त्यांच्यात घनिष्ट नाते निर्माण झाले''. त्या खेरीज गांधी आणि टॉलस्टॉय यांचे संबंध त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारातून दिसून येतात. सदर पत्रांद्वारे गांधी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासंबंधी टॉलस्टॉयशी हितगुज करीत असत. तसेच सदर पत्रातून निर्माण झालेली जवळीक लक्षात घेता दोघांमधील असणारे मित्रत्वाचे तसेच गुरुशिष्याच्या संबंधांची प्रचिती येते.

## महात्मा गांधी आणि जॉन रस्किन :

एक श्रेष्ठ साहित्यिक म्हणून इंग्लंडचे जॉन रस्किन यांनी जगाला प्रख्यात साहित्याची देणगी दिली आहे. रस्किनचे" अन टू धिस लास्ट" या ग्रंथाचा गांधींच्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यांनी १८९४ ते १९०४ पर्यंत चालवलेला वकिलाचा व्यवसाय बंद करण्याचा निश्चय केला. या लहानश्या ग्रंथाने गांधींना त्यांच्या जीवनाचा अर्थ सांगितला. सबंध रात्र न झोपता संपूर्ण प्रवासात गांधींनी

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

ग्रंथ वाचून काढला आणित यांना आपल्या जीवनाचे सार समजले. रस्किनमुळे गांधींना श्रमजीवी जीवनाचे महत्व उमगले. व्यक्तीच्या जीवनातील श्रमाला जर नीतिमत्तेची जोड असेल तर नक्कीच आयुष्य हे समाधानाने सुखी जगता येते याची जाणीव गांधींना झाली. रस्किनमुळे त्यांना विशेषत: शेतीचे व त्याला लागणाऱ्या श्रमाचे महत्व समजले. "गांधीजींनी आपल्या 'इंडियन ओपिनियन' या वृत्तपत्रात रस्किनच्या पुस्तकाचा सारांश प्रसिद्ध केला व 'सर्वोदय' नावाचा गुजराती ग्रंथ प्रसिद्ध केला. या पुस्तकाच्या नावासंबंधी गांधीजी प्रस्तावनेत म्हणतात, ''पुस्तक लखवानो हेतू सर्वेनु कल्याण सर्वेनु उदय (मात्र वधारेनोनही) – एवो होवाथी आमे आल खाणने 'सर्वोदय' एवू नाम आप्यु छे''. गांधींना रस्किनचा ग्रंथ आवडण्याचे कारण म्हणजे पाश्चात्य संस्कृतीत बहुसंख्य लोकांच्या हितास जे महत्व दिले जाते त्याचे खंडन करून रस्किनने केवळ बहुसंख्य लोकांच्या हितास प्राधान्य न देता सर्वांचे सुख जपावे असे म्हटले. सुखाच्या कक्षा ह्या केवळ शारीरिक व आर्थिक बाबीं पुरता मर्यादित न ठेवता इतर गोष्टींसाठी ही व्यापक राखल्या आणि महत्वाचे म्हणजे कोणतेही सुख मिळवण्यासाठी नीतिनियमांचा भंग होऊ नये याची विशेष काळजी रस्किनने घेतलेली आढळून येते. त्याचा हा नीतिवाद गांधींना भावून गेला. त्यामुळे रस्किनच्या विचारवादाने प्रेरित होऊन गांधींनी त्याचा सारांश आपल्या सर्वोदय तत्वज्ञानात अंकित केला.

## महात्मा गांधी आणि हेन्री डेविड थोरो :

आधुनिक अमेरिकेतील थोरलेखक, विचारवंत वतत्वचिंतक म्हणून थोरो यांना ओळखले जाते. डेविड थोरोवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव होता. तसेच भारतीय तत्त्वज्ञानाने थोरोच्या मनावर सखोल परिणाम केले होते.भारतीय संस्कृतीसाठी प्रचंड आवड असलेला थोरो हा सत्याग्रहाच्या मूल्यासाठी गांधीजींना प्रेरक ठरला. गांधीजी हे थोरोच्या 'Civil Disobedience' ह्या ग्रंथाने खूपच प्रभावित झाले होते. सत्याग्रहाचे शस्त्र वापरण्याकरिता हजारो लोकांची आवश्यकता नाही तर केवळ एक प्रामाणिक माणूस पुरेसा असतो. एखाद्या सत्कृत्य कार्य पार पाडण्यासाठी सविनयाच्या मार्गाने गेले तर एकाचे रूपांतर हजारो लोकात होण्यास दीर्घकाळ लागत नाही हे थोरोने जगास दाखवून दिले. ''महात्मा गांधींवर थोरोचा प्रभाव केवळ सविनय कायदेभंग या निबंधापुरता मर्यादित नव्हता तर 'हिंद स्वराज्य, 'मंगल प्रभात' या ग्रंथांचे काळजीपूर्वक वाचन केल्यास त्यांच्यावर थोरोचा किती खोल प्रभाव होता ते दिसून येते. यंत्र सामग्रीचा वापर, रेल्वे, साधी राहणी, नीतिमत्ता, तात्विक विचारांना अनुसरून जीवन या संदर्भात गांधींच्या विचारांचे वाचन करताना थोरोच्या 'वॉल्डन' या ग्रंथाशी आणि 'तत्व हीन जीवन' या निबंधाशी असणारे त्यांचे साम्य ध्यानात येते. ''हेन्री डेविड थोरो पासून मिळालेल्या सत्याग्रहाच्या देणगीने गांधींनी स्वातंत्र्य लढा अहिंसक मार्गाने लढला. आपल्या हिंद स्वराज या पुस्तकाच्या प्रस्तावनेत

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधींनी विशेष उल्लेख करून टॉलस्टॉय, रस्किन, इमर्सन आणि थोरो यांना आपल्या मनावर त्यांच्या प्रभावाची सखोल छाप पाडल्याबद्दल श्रेय दिले आहे. तसेच त्यांच्या विचारांचे अनुकरण आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला आहे.

## समारोप :

गांधींच्या उभ्या आयुष्यात, त्यांनी दिलेल्या अनेक प्रकारच्या योगदानात वरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव आहे व ता गांधींनी लिहिलेल्या केवळ साहित्यातून दिसून येत नाही तर गांधींच्या आचरण पद्धतींमधूनही झळकतो. त्याचे श्रेय बापूंनी वेळोवेळी या विचारवंतांना दिले आहे यात शंका नाही.गांधी यक्तिमत्वाच्या अनेक पैलूमधील महत्वाची मूल्यधारा ही टॉलस्टॉय, रस्किन आणि थोरो यांच्या विचाराने प्रभावित आहे. गांधींनी जगाला आपल्या तत्वज्ञानाच्या स्वरूपात जे नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान दिले ती समाजातील सवू लोकांना मिळालेली एक अमूल्य देणगी आहे असे म्हणता येईल.

## संदर्भसूची :

१. https://marathibhau.com/mahatma-gandhi-information-in-marathi/
२. नायक, राजू, (नोव्हेंबर, २०१६), 'विशेष लेख: कसे घडले महात्मा गांधी?', लोकमत प्रकाशित, https://www.lokmat.com/editorial/special-article-life-mahatma-gandhi/
३. https://vishwakosh-marathi-gov-in/21569/ महात्मागांधी, मराठी विश्वकोश ज्ञानमंडळ
४. आस्था अन अनास्था!, https://divyamarathi-bhaskar-com/news/EDT-mahatama-gandhi-tolstoy-farm-south-africa-3081104-html,
५. स्वर्गे–मदाने, विद्या, (November, २०१६), टॉलस्टॉय–गांधीजी ह्यपत्र–नाते!, लोकसत्ता प्रकाशित
६. देवगिरीकर ज्य. र. गांधीचा वारसा, महाराष्ट्र गांधी स्मारक–निधी पुणे, २९
७. धनगर, अभिषेक (ऑक्टोबर २०१९), गांधी, थोरो आणि सविनय प्रतिकार https://marathi.thewire.in/gandhi-thoreau-and-civil-obedience